सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे- ४११००१.
दूरध्वनी क्रमांक : २६१२२८४६/४७ फॅक्स क्रमांक ०२०-२६१३३०८२
Email coop.dakshata@gmail.com

---

जा.क्र.दक्षताकक्ष/सआ-१३/परिपत्रक/२३ ९६८ दिनांक :-२८/०८/२०२३.

## परिपत्रक

**विषय:- प्रशासकीय/अर्धन्यायीक स्वरुपाचे आदेशबाबत होणा-या तक्रारीबाबत.**

सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयामध्ये वेगवेगळया स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त होत असतात. सदरील तक्रारी पैकी भ्रष्टाचार व लाचलुचपत या अनुषंगाने अधिका-यांच्या तक्रारींबाबत दक्षता कार्यासनाकडून कार्यवाही केली जाते. तथापि, या कार्यालयातील विविध शाखांकडून क्षेत्रिय कार्यालयातील अधिका-यांकडून प्रशासकीय/अर्धन्यायीक स्वरुपाचे आदेशा विरुध्दच्या तक्रारी दक्षता कार्यासनाकडे वर्ग केल्या जातात.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये क्षेत्रिय कार्यालयाकडून विविध अर्धन्यायीक स्वरुपाचे आदेश पारीत होत असतात. सदरील आदेशाबाबतचा निर्णय कायदा व नियम यांना अनुसरुन संबंधीत क्षेत्रिय कार्यालयातील अधिका-यांनी घेतलेला असतो. सदर निर्णय/ आदेशाबाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील कलम १५२ अन्वये अपिल व कलम १५४ अन्वये पुर्ननिरिक्षणाची तरतूद आहे. सदरचे आदेश मान्य नसल्यास तक्रारदार त्या बाबत विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था व मा. मंत्री महोदय सहकार यांचेकडे सदर कलमान्वये दाद मागू शकतात.

क्षेत्रिय कार्यालयातील अधिका-यांनी पारीत केलेले आदेश हे अर्धन्यायीक स्वरुपाचे असल्याने व त्याविरुध्द अपील/ पुर्ननिरीक्षण ही तरतुद उपलब्ध असताना त्याबाबतची वैधता तपासणे योग्य होणार नाही. अर्धन्यायीक स्वरुपाचे आदेश पारीत करताना किंवा सदभावनापूर्वक केलेल्या कृत्याबद्दल संबंधीत अधिका-याला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १६२ अन्वये हानिरक्षण प्राप्त होते. सबब अशा प्रकरणांमध्ये या कार्यालयाने हस्ताक्षेप करणे उचित होणार नाही.

सदर परिपत्रकाद्वारे सर्व कार्यासन अधिकारी यांना सूचित करण्यात येते की, अर्धन्यायीक स्वरुपाचे आदेशा विरुध्दच्या तक्रारी दक्षता कार्यासनास वर्ग न करता सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणेबाबत तक्रारकर्ता यांना ज्या कार्यासनात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत त्या कार्यासनाच्या स्तरावरुन कळविण्यात यावे.

(शैलेश कोतमिरे)
अपर निबंधक (प्रशासन)
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रती- कार्यासन अधिकारी (सर्व),मुख्यालय पुणे

प्रत माहितीस्तव- १. पर्यवेक्षकीय अधिकारी(सर्व), मुख्यालय पुणे.
२. मा. सहकारआयुक्त व निबंधक यांचे खाजगी सचिव